# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २६.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २५/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४०,९००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**चोरी** :—दिनांक २४/१०/२०२२ रोजी फिर्यादी विजय किशनराव ढोबळे रा आसोला ता.औंढा ना. जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हट्टा येथे कलम ३७९ भा.द.वी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि २४.१०.२०२२ रोजीच रात्री १०.३० वा ते दिनांक २५.१०.२०२२ रोजी चे मध्य रात्री ०१.०० वा दरम्याण मौजे आसोला शिवारातील साईबारचे जवळ अज्ञात चोरटयाने फिर्यादीने त्याचे शेतात वाळविण्यास घातलेले अंदाजे १९ क्विंटल सोयाबीन पौती अंदाजे आठ ते नउ किंटल सोयाबीन किमंती अंदाजे ४०,००० रू किंमतीचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने झाकुन ठेवलेल्या सोयाबीन पोत्यात भरून चोरून नेले आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हट्टा पोलीस तपास करित आहेत.